स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या
मानव्यशास्त्र विद्याशाखेतील राज्यशास्त्र विषयाच्या आचार्य पदवीकरीता
सादर करावयाचा संशोधन आराखडा.

इस्त्रायल – पॅलेस्टाईन देशातील राजकीय संबंधाचा चिकित्सक अभ्यास (कालखंड – 2008 ते 2023)

संशोधक

श्री गिरीश बाबुराव कुलकर्णी

उच्च माध्यमिक शिक्षक

लोक बिरादरी कनिष्ठ महाविद्यालय,

हेमलकसा ता भामरागड जि. गडचिरोली

संशोधक मार्गदर्शक

प्राचार्य डॉ. गव्हाणे महादेव हरिदास

राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

ऑगस्ट 2023

प्रस्तावना:

इस्त्रायल – पॅलेस्टाईन वाद

आज जगातील ज्या विविध देशात वाद विवाद सुरु आहेत, त्या इस्त्रायल आणि इतर अरब देश हे वाद केवळ मोठया प्रमाणावरच नाही तर अत्यंत हिंसक पध्दतीत सुरू आहेत. इस्त्रायल आणि पॅलेस्टाईन हा वाद दुस-या महायुध्दानंतर सुरू झालेला आहे. अरब हे पॅलेस्टाईनमधील मूळ निवासी आहेत. पण ज्यूंसाठी इस्त्रायलची स्थापना झाली व संयुक्त राष्ट्राच्या प्रस्तावानुसार 1947 ला हा प्रस्ताव मंजूर करण्यात आला होता. त्याअगोदरही ब-याच घटना घडल्या होत्या. ब्रिटिशांच्या मध्यस्थीने 1917 ला ज्यूंसाठी स्वत:चं घर म्हणून पॅलेस्टाईनमध्ये जागा देण्यात आली, ज्याला बॅलफोर करार असं म्हटल जातं. पहिल्या महायुध्दानंतर कोणाचे कोणत्या देशावर नियंत्रण असेल याची विभागणी िब्रिटनने केली, ज्यात ब्रिटनने पॅलेस्टाईन स्वत:ला ठेवलं.

ज्यूंची समस्या अत्यंत कठीण बनली होती. दुस-या महायुध्दानंतर अस्तित्वात ओल्या संयुक्त राष्ट्राकउे हा मुद्या देण्यात आला. यावेळी इस्त्रायलच्या बाजूने प्रस्ताव मंजूर झाला. पॅलेस्टाइन आणि इस्त्रायल असं विभाजन करण्यात आलं. ज्यूंची

लोकसंख्या जास्त असलेला भाग इस्त्रायलला, हा पॅलेस्टाइन अरबींना देण्यात आला. यासोबतच जेरूस्लेमा मुद्याही किचकट झाला. कारण, इथे निम्मी लोकसंख्या मुस्लीम, तर निम्मी ज्यू होती. त्यामुळे या भागावर आंतरराष्ट्रीय नियंत्रण ठेवण्यात आलं, पहिल्या महायुध्दानंतर मोठया प्रमाणात स्थलांतर होऊ लागलं. ज्यू ऑटोमन साम्राज्यात फक्त 3 टक्के होते, तर 30 वर्षातच ही लोकसंख्या पॅलेस्टाईनमध्ये 30 टक्यांनी वाढली. स्थानिक अरबी लोकांकडून ज्यू नागरिकांनी मोठया प्रमाणात जागा खरेदी केली. काही वर्षानी दुस-या महायुध्दात ज्यूंचा युरोपमये मोठया प्रमाणात छळ करण्यात आला. ज्यूंची युरोपात अक्षरश: कत्तल करण्यात आली ज्यूंना गॅस चेंबरमध्ये टाकूण मारण्यात आलं. हा इतिहासातला मोठा नरसंहार मानला जातो. 42 लाख लोक यावेळी मारले गेले असं सांगितलं जातं. ज्यू लोकसंख्या अत्यंत कमी असतानाही त्यापैकी 43 लाख लोकांना मारण्यात आलं. यानंतर प्रत्येक ज्यू आपला जीव वाचवण्यासाठी इस्त्रायलकडे पळाला.

इस्त्रायलवर हल्ला- पहिलं अरब युध्द:

संयुक्त राष्ट्राकडून ज्यूंची लोकसंख्या जास्त असलेला भाग इस्त्रायलला, तर पॅलेस्टाईन अरबींना देण्याची घोषणा होताच इजिप्त, सीरिया, इराक, ट्रान्स जॉर्डन या देशांनी इस्त्रायलवर हल्ला केला. पण नव्याने जन्म घेतलेल्या इस्त्रायलने धैर्याने

या युध्दाचा सामना केला आणि या सर्व देशांना पिटाळू लावलंच, शिवाय यांची जागाही हिसकावून घेतली 1947 ला मिळालेल्या जागेपेक्षा जास्त क्षेत्रफळ इस्त्रायलने मिळवलं होतं. या युध्दात इस्त्रायलने स्वत:ला वाचवलं असलं तरी मोठी समस्या समोर आली. या युध्दात इस्त्रायलमधून जवळपास 7 लाख लोकांनी स्थलांतर केलं आणि विविध देशात आसरा घेतला. यामुळे गाझावर इजिप्तने तर वेस्ट बँकवर जॉर्डनने कब्जा केला, तर उर्वरित भागावर इस्त्रायलचा ताबा होता. त्यामुळे मूळ देश असलेल्या पॅलेस्टाईनचं अस्तित्वच धोक्यात आलं.

अरब युध्दानंतर इस्त्रायलने जिंकलेला भाग गुलाबी रंगात

इस्त्रायलवर पुन्हा हल्ला:

यानंतर 1967 मध्ये पुन्हा एकदा सहा दिवसांचं एक युध्द झालं हे युध्द सीरिया, जॉर्डन आणि इजिप्त विरूध्द असं होतं. इजिप्तने आपलं सैन्य इस्त्रायलच्या

सीमेवर तैनात केलं. पण त्याअगोदरच इस्त्रायलने हल्ला सुरू केला आणि इजिप्तला श्रमोठा धक्का दिला. या युध्दात इस्त्रायलने सीरियाकडून गोलन हाईट्स, जॉर्डनकडून वेस्ट बँक आणि इजिप्तकडून गाझा हिसकावून घेतलं. पण नंततर इस्त्रायलने सिनाई हा मोठा भाग इजिप्तला परत केला, पण वेस्ट बँक आणि गाझा आजही इस्त्रायलकडे आहेत.

1973 ची लढाई आणि इस्त्रायलचा विजय:

इस्त्रायलची स्थापना झाल्यानंतर शेजारच्या देशांकडून होणारे हल्ले थांबले नव्हते. 1973 ला इस्त्रायलवर इजिप्त आणि सीरियाने हल्ला केला. यातही इस्त्रायलने स्वत:ला वाचवलं. पण एक सकारात्मक बाजू म्हणजे इजिप्त आणि इस्त्रायल यांच्यात यावेळी संवाद झाला. यानंतर इस्त्रायलला इजिप्तकडून एक देश म्हणून मान्यता मिळाली, तर इजिप्तचा हिसकावून घेतलेला भाग इस्त्रायलने परत केला. 1978 च्या कॅम्प डेव्हिड करारानुसार हे सगळं झालं. पण इजिप्तने इस्त्रायलला मान्यता दिली हा वादग्रस्त निर्णय होता. इजिप्तच्या या निर्णयामुळे त्यांच्या राष्ट्रपतींची हत्या करण्यात आली. यानंतर कुणासमोरही हार न मानलेल्या इस्त्रायलसोबत अरब दशांनीही शांततेचाच मार्ग निवडला. कारण तीन ते चार वेळा इस्त्रायलने या देशांचा पराभव केला होता.

जेरूसलेममध्ये युध्द सदृष्य परिस्थिती संघर्षाची खरी सुरूवात:

आतापर्यंत फक्त इस्त्रायलचा संघर्ष सुरू होता. कारण, अरब देशांचे हल्ले बंद झाल्यानंतर इस्त्रायलचं हे एक प्रकारे मोठं यशच होतं. परंतु पुढे पॅलेस्टाईन स्वतंत्र संघटनेने (पीएलओ) स्वातंत्र्यासाठी संघर्ष सुरू केला. अनेक हल्ले केले, इस्त्रायलवर दबाव टाकरण्याचा प्रयत्न केला. 1987-93 या काळात इस्त्रायल आणि पॅलेस्टाईन संघर्षाचा पहिला टप्पा मानला जातो. इस्त्रायलवर अनेक हल्ले झाले, तर इस्त्रायलनेही याला प्रत्युत्तर दिलं. ज्यू आणि पॅलेस्टाईन नागरिकांचा या हिंसाचारात मृत्यु होतच राहिला.

इमासचा उदय:

सध्या इस्त्रायलवर हल्ले करत असलेलया इमासचा उदय याच काळात झाला. पीएलओपेक्षा हमासची विचारधारा अत्यंत वेगळी होती. हमासचा इस्त्रायलला तीव्र विरोध होता, शिवाय इस्त्रायलला आम्ही मान्यताच देत नाही, असं हमासचं म्हणणं होतं. तर पीएलओ त्यांच्या हक्कासाठी लढत होती. 1993 ला पहिल्यांदाच इस्त्रायल आणि पॅलेस्टाईनमध्ये मोठा शांती करार झाला. यासाठी अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांनी मध्यस्थता केली. याला ओस्लो करार म्हटलं जातं. या करारात इस्त्रायल आणि पीएलओ यांनी एकमेकांच्या काही मागण्या मान्य केल्या.

संघर्षाचा दुसरा टप्पा:

2000 साली कॅम्प डेव्हिड येथे झालेली चर्चा अपयशी ठरली. त्यानंतर संघर्षाचा दुसरा टप्पा सुरू झाला. इस्त्रायलमध्ये अनेक हल्ले करण्यात आले. मोठया प्रमाणात हिंसाचार झाला, ज्यात जू आणि पॅलेस्टाईन नागरिकांनाही आपला जीव गमवावा लागला या काळातच इस्त्रायलच्या धोरणातही अनेक बदल घडून आले. हा मूद्दा सोडवण्यापेक्षा त्याचं नियोजन करावं लागेल, असं धोरण आखण्यात आलं. याशिवाय इस्त्रायलच्या विचारधारेतही बदल घडून आला. आतापर्यंत इस्त्रायलमध्ये पॅलेस्टाईन वाद सोडवणारे पक्ष जिंकत होते, तर आता पॅलेस्टाईनचा खात्मा करू असं म्हणणारे पक्ष निवडणूक जिंकायला लागले.

गाझामधून इस्त्रायलने 2005 मधून आपलं सैन्य मागे घेतलं. यानंतर हमासने गाझामध्ये निवडणूक जिंकली आणि पूर्ण ताबा मिळवला. हमास सत्तेत आल्यामुळे इस्त्रायलची डोकेदूखी वाढली. हमासने इस्त्रायलवर हल्ले सुरू केले. परिणामी इस्त्रायलने गाझाला पूर्णपणे ब्लॉक केलं. सीमा बंद करण्यात आल्या आणि गाझामध्ये जाण्यासाठी इस्त्रायल सैन्याची परवानगी अनिवार्य करण्यात आली.

इस्त्रायल-पॅलेस्टाईन वादाची ऐतिहासिक पार्श्वभूमी:

पहिल्या महायुध्दाच्या काळात पॅलेस्टाईनमध्ये ज्यूंची संख्या फार कमी होती, परंतु 30 वर्षात ही लोकसंख्या मोठया प्रमाणात वाढली. स्थानिक अरब लोकांकडून ज्यू लोकांनी मोठया प्रमाणात जमिनींची खरेदी केली. दुस-या महायुध्दापूर्वी जर्मनीमध्ये ज्यू लोकांच खूप मोठया प्रमाणात शीरकाण करण्यात आलं ज्यामुळे

आपला जीव वाचवण्यासाठी असंख्य ज्यू लोकांनी पश्चिम आशियाच्या या भागाकडे धाव घेतली, आणि त्यानंतर या निर्वासित ज्यू लोकांनी ज्यू बहूल भागावर आपला मालकीहक्क सांगत याच भूमीवर स्वतंत्र इस्त्रायलची घोषणा केली.

18 मे 1848 या दिवशी तेल अवीव या शहरातून इस्त्रायलया निर्मितीची घोषणा झाली. खरंतर या नव्या राष्ट्र निर्मितीला आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रखर विरोध झाला, पण सगळयात आधी या नवराष्ट्रनिर्मितीला अमेरिकेने मान्यता दिली, त्यानंतर अमेरिकेने अनेक देशावर दबव टाकून संयुक्त राष्ट्र संघामध्ये इस्त्रायल निर्मितीसाठीचा मार्ग मोकळा करून घेतला आणि यामुळे ज्यूंच्या झियोनिझला प्रचंड बळ प्राप्त झालं. यानंतर इस्त्रायलचा विरोध करण्यासाठी अनक पॅलेस्टिनी संघटनांचा उदय झाला. त्यात पॅलेस्टिनीयन लिबरेशन ऑर्गनायझेशन ही एक महत्वाची संघटना होती. न्याय हक्कांसाठी लढा देणं हा या संघटनेचा मुख्य अजेंडा होता.

सुरूवातीच्या काळात हा संघर्ष इस्त्रायल पॅलेस्टाईन इतकाच मर्यादीत नव्हता, इस्त्रायलच्या आजूबाजूला असलेल्या देशांनाही इस्त्रायलचं हे स्वतंत्र अस्तित्व मान्य नव्हतं. इस्त्रायलची स्थापना होताच इजिप्त, सिरिया, इराक, जॉर्डन या देशांनी इस्त्रायलवर हल्ला केला. पण नुकत्याच जन्म घेतलेल्या इस्त्रायलने अतिशय धीराने या युध्दाला तोंड दिलं आणि हे अरबी आक्रमण परतवून लावलं, आणि त्यांच्या जागेवर कब्जा केला. इस्त्रायलचा हा साम्राज्यवादी दृष्टीकोन इतर देशांच्या असंतोषाचं प्रमुख कारण बनला आणि त्याची परिणीती इस्त्रायलवर झालेल्या दुस-या हल्यात झाली. हे युध्द सीरिया, जॉर्डन, इजिप्त विरूध्द इस्त्रायल असं झालं.

इजिप्तने खूप मोठया प्रमाणात आपलं सैन्य इस्त्रायलच्या सीमेवर तैनात केलं. पण खरं युध्द सुरू होण्याआधीच इस्त्रायलने इजिप्शियन सैन्यावर हल्ले सुरू केले आणि इजिप्तला मोठा धक्का देत चारी मुंडया चीत केलं आणि आपल्या राष्ट्राचं अस्तित्व आणखी बळकट केलं. या युध्दात सुध्दा इस्त्रायलने मोठया प्रमाणावर भूभाग काबीज केला. अर्थात यामुळे आजूबाजूच्या देशांच भौगालिक अस्तित्व आणि राजकिय प्रतिमा या दोन्ही धोक्यात आल्या होत्या. आणि त्याचा परिणाम दिसला 1973 च्या लढाईमध्ये.

सध्या जेरूस्लेमचा मुद्दा महत्वाचा आहे. कारण, या शहरात ज्यू, ख्रिश्चन आणि मुस्लीम धर्माचे प्रसिध्द धार्मिकस्थळे आहेत. पण इस्त्रायलने या शहरावर नियंत्रण ठेवल्याने वाद निर्माण झाला आहे. जेरूस्लेमच्या पूर्व भागात मुस्लीम, पश्चिमेला ज्यू आणि मध्य भागात ख्रिश्चन लोकसंख्या जास्त आहे. मुस्लीम धर्माची मक्का आणि मदीना नंतरची सर्वात प्रसिध्द मशिदही जेरूस्लेममध्येच आहे. संयुक्त राष्ट्राच्या करारानुसार, हे शहर इस्त्रायलला देण्यात आलेलं नाही. पण इस्त्रायलकडून हीच आपली राजधानी असल्याचा दावा केला जातो. पण जगाकडून याला अद्याप मान्यता मिळालेली नाही. सर्व देशांचे दुतावास अजूनही तेल अविवमध्येच आहेत.

दुसरा मोठा मुद्दा हो पॅलेस्टाईन विस्थापितांचा आहे. जवळपास 50 लाख पॅलेस्टाईन नागरिक सीरिया, जॉर्डन, इजिप्त आणि इतर देशांध्ये विस्थापित म्हणून राहतात. त्यामुळे भविष्यात कधीही शांतता करार झाला तर या पॅलेस्टाईन नागरिकांना देशात घेतलं जावं अशी पॅलेस्टाईनची मागणी आहे. पण इस्त्रायलचा

यासाठी स्पष्ट नकार आहे. कारण इस्त्रायलची लोकसंख्याच 80 लाख आहे त्यात 50 लाख पॅलेस्टाईन नागरिकांना घेतलं तर सुरक्षेचा मुद्दा निर्माण होईल असं इस्त्रायलचं म्हणणं आहे.

इस्त्रायल-पॅलेस्टाईन वादावर संभाव्य तोडगा:

इस्त्रायल-पॅलेस्टाईन यांच्यातील वाद हा सतत उद्रेक होणारा ज्वालामुखी बनला आहे, त्यातून जीवितहानी शिवाय दोन्ही पक्षांच्या हाती काहीही लागत नाही. शेजारीच नाही तर दूरवरचे देशही त्यात नाहक ओढले गेले आहेत. गाझापट्टीचा संपूर्ण परिसर आणि इस्त्रायलचा काही भाग या संघर्षाची किंमत मोजत आहेत, परंतु यात कोणाचाही हेतू पूर्ण होत नाही. जगभरातील तज्ञांच्या मते, इस्त्रायल आणि पॅलेस्टाईनला दुहेरी राज्य सिध्दांत मान्य करावा लागेल. इतिहासात ज्यूंचा नरसंहार करण्यात आला होता, मोठया प्रमाणात ज्यूंची कत्तल करण्यात आली होती, तर सध्या पॅलेस्टाईनमधील मूळ नागरिक हे सुध्दा इतर देशामध्ये आसरा घेवून राहत आहेत. त्यामुळे दोन्ही देशांना एकमेकांच्या भावना समजून घ्याव्या लागतील, असं तज्ञ सांगतात. वरील सर्व बाबींचा विचार करून इस्त्रायल व अरब देशांतील जे राजकीय संबंध विविध विवादामुळे विकोपाला गेलेले आहे त्याचे व या देशातील विवादांना कारणीभूत असणा-या कारणांचे चिकित्सक अध्ययन करण्याचे नियोजित करण्यात आले आहे.

संशोधनाची आवश्यकता व महत्व:

प्रस्तुत संशोधनात इस्त्रायल व अरब देशांतील संबंधाचे चिकित्सक अध्ययन करण्याचा उद्देश आहे. हे सर्व देश पश्चिम आशिया खंडातील आहे. या देशाच्या अर्थव्यवस्था वेगाने वाढणा-या असून या देशामध्ये आपआपसामध्ये वर्चस्वाची लढाई ही सातत्याने दिसत आहे. इस्त्रायल व अब यांच्या संबंधामध्ये असे अनेक विवादास्पद मुद्दे आहे. या विवादास्पद मुद्यामुळे या देशात नेहमीच युध्दजन्य स्थिती निर्माण होतांना दिसून येते. त्याचा विपरीत परिणाम या सर्व देशावर होवू शकतो म्हणून इस्त्रायल व अरब संबंधाचे विवादास्पद करणांची चिकित्सक अध्ययन करणे अत्यंत महत्वाचे ठरते.

संशोधनाची उद्दिष्टये:

- इस्त्रायल-पॅलेस्टाईन देशाच्या राजकीय तत्वाचे सखोल अध्ययन करणे.
- इस्त्रायल-पॅलेस्टाईन देशाच्या भौगोलिक-आर्थिक घटकाच्या पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.
- इस्त्रायल-पॅलेस्टाईन प्रश्नाबाबत पाश्चिमात्य देशाच्या भूमिकेचा अभ्यास करणे.
- इस्त्रायल-पॅलेस्टाईन देशाच्या राजकीय संबंधाचा अभ्यास करणे.
- इस्त्रायल-पॅलेस्टाईन देशातील विविध तणावाच्या घटकांचा अभ्यास करणे.
- इस्त्रायल-अरब (पॅलेस्टाईन) प्रश्नाबाबत भारताच्या भूमिकेचा अभ्यास करणे.
- इस्त्रायल-पॅलेस्टाईन संबंधाचा भारतावर होणा-या राजकीय परिणामाचा अभ्यास करणे.

- इस्त्रायल-पॅलेस्टाईन देशातील राजकीय संबंध सधारण्यासाठी राजकीय दृष्टिकोनातून संभाव्य सूचना (शिफारशी) देणे.

संशोधनाची गृहितकृत्ये:

प्रस्तुत संशोधनाची गृहीतके पुढीलप्रमाणे आहेत.

1. इस्त्रायल-पॅलेस्टाईन देशातील संबंध अत्यंत तणावपूर्ण दिसून येतात.
2. इस्त्रायल-पॅलेस्टाईन देशातील (Land – Crisis) भूमीवरून वाद दिसून येतो
3. इस्त्रायल-पॅलेस्टाईन प्रश्नाबाबत विविध देशांच्या भूमिकांमध्ये कालानुरूप बदल झालेला दिसून येतो.
4. इस्त्रायल-पॅलेस्टाईन देशातील विविध कराराचे पालन होताना दिसून येत नाही.

संशोधनाची व्याप्ती मर्यादा:

संशोधनाची उद्दिष्टये ठरविल्यानंतर अध्ययन करतांना त्याची व्याप्ती मर्यादा ठरविणे अत्यंत आवश्यक ठरते. संशोधन क्षेत्राची व्याप्ती मर्यादा निश्चीत झाली नाही तर संशोधन व्यापक दिशाहीन दिर्घ कालखंडाचा होऊ शकतो. सदर संशोधन इस्त्रायल व पॅलेस्टाईन राजकिय संबंधाचा चिकित्सक अभ्यास (कालखंड-2008 ते 2023) असा निश्चित करण्यात आला आहे.

पूर्व संशोधन साहित्याचा आढावा:

संशोधकाला संशोधन कार्याला सुरूवात करण्यापूर्वी निवडलेल्या समस्येबाबत अधिक माहिती मिळविणे महत्वाचे वाटले. संशोधकाने वर्तमान समस्येचे अध्ययन करतांना पूर्वी झालेल्या विविध संदर्भग्रंथ, याविषयाशी संबंधीत समानता असणारी पुस्तके, प्रबंध, लघु प्रबंधाचे अध्ययन केले. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर झालेल्या संशोधनाचा मागोवा शोधप्रबंधाच्या या प्रकरणात घेण्यात आला आहे. रोली व टेलर (2006) यांच्या संशोधन कार्यात 1948-2005 मधील इस्त्रायल आणि पॅलेस्टाईन यांच्यातील संघर्षाच्या इतिहासाचा मागोवा घेण्यात आला. हे संशोधन इस्त्रायल आणि पॅलेस्टाईन यांच्यातील सीमावर्ती संघर्षावर लक्ष केंद्रित करते.

समुहा (2010) यांचे संशोधन कार्य 1976 ते 2009 पर्यंत केलेल्या प्रतिनिधिक सर्वेक्षणातील निष्कर्ष व विरोधाभास प्रस्तुत करतो, दोन्ही बाजूमधील परस्पर सामंजस्यावर जोर देते.

राबी व म्यूलर (2017) यांचे संशोधन कार्य 1967 च्या युध्दानंतर अखाती अरब राष्ट्राच्या इस्त्रायलकडे बदललेल्या दृष्टीकोनाचे विश्लेषण करते.

बेक (2020) यांचे संशोधन कार्य प्रादेशिक सतेसाठी होणा-या संघर्षाचा अभ्यास करते. अशाप्रकारे पूर्ण अध्ययने लक्षात घेतली असता असे दिसून येते की, अरब इस्त्रायल यांच्यातील संघर्षाचा अभ्यास झालेला आहे. परंतू संघर्षामुळे होणारे राजकीय परिणाम याचा अभ्यास झाला नाही. म्हणून ही उणीव लक्षात घेवून

संशोधनकर्त्याने हा विषय संशोधनासाठी निवडला आहे. प्रत्यक्ष संशोधनकार्य करतांना संशोधन साहित्याचे सखोल पुनरावलोकन करण्यात येणार आहे.

संशोधन पध्दती व तथ्य संकलन:

इस्त्रायल व अरब देशातील संबंधांशी निगडीतत कारणांचे चिकित्सक अध्ययन करण्यासाठी विश्लेषणात्मक, वर्णनात्मक ग्रंथालयीन पध्दीचा वापर करण्यात येईल.

तथ्य संकलन:

प्रस्तुत संशोधन विषयाचे संशोधन करीत असतांना संशोधकाकडून तथ्य संकलनासाठी प्राथमिक दुय्यम स्त्रोताचा उपयोग केला जाणार आहे.

प्राथमिक स्त्रोत :

इस्त्रायल व पॅलेस्टाईन या दोन्ही देशातील शासकीय करार (Government Agreeementss), अहवाल (Reports), शासकीय कागदपत्रे (Government Documents), भाषणे (Impotant speeches) इ. स्त्रोताव्दारे माहिती संकलित करण्यात येणार आहे.

व्दितीय स्त्रोत:

व्दितीय स्त्रोत हे संशोधनकर्ता स्वत: संशोधन क्षेत्रात जावून संबंधित व्यक्तीकडून गोळा करीत नाही तर इतर व्यक्तीनी पूर्वीच गोळा केलेली असून ही लिखीत स्वरूपाची असतात. व्दिीय तथ्ये ही प्रकाशित अप्रकाशित प्रलेख अहवाल,

दैनंदिनी, हस्तलिखीत पत्रे, आत्मचरित्र, संस्मरण या स्वरूपात असतात. सदर संशोधन इस्त्रायल व अरब दशातील संबंधाशी संबंधित उपलब्ध असलेली माहिती विविध मासिके, दैनिक वृत्तपत्रे, विविध देशांनी प्रकाशित केलेले शासकीय अहवाल व पुस्तकांचा व्दितीय तथ्य संग्रहासाठी उपयोग केला जाईल.

संशोधनाचा कालावधी व कृती कार्यक्रम:

सदर संशोधनाचचा कालावधी 3 वर्ष असेल. संशोधन करतांना पुढीलप्रमाणे कृती कार्यक्रम असेल.

1. संशोधन संबंधीत प्राथमिक कार्य - 6 महिने
2. साहित्य सर्वेक्षण व संपादन - 6 महिने
3. तथ्य संकलन - 18 महिने
4. तथ्य विश्लेषण - 3 महिने
5. अहवाल लेखन व प्रस्तुतीकरण - 3 महिने

अशाप्रकारे 36 महिन्याचा कृती कार्यक्रम तयार करून संशोधन पूर्ण करण्यात येईल.

प्रकरण योजना

प्रस्तुत संशोधन विषयाचा अभ्यास करतांना संशोधन अहवालातील विषयाची खालीलप्रमाणे प्रकरणाची मांडणी करण्यात येईल

1. प्रस्तावना (प्रस्तुत प्रकरणात विषय प्रवेश, संशोधन विषयाची निवड, अभ्यास विषयाचे महत्व उद्दिष्टये, गृहितके व संशोधन प्रकरण रचना इत्यादी घटकांची चर्चा करण्यात येईल)
2. पूर्व संशोधनाचा आढावा
3. इस्त्रायल व अरब देशातील विवादांचे विश्लेषण
4. इस्त्रायल व अरब देशांचे विविध भुभागावरील दावे व प्रतिदावे यांचे विश्लेषण
5. राजकीय स्थित्यंतरामुळे इस्त्रायल व अरब देशात निर्माण झालेले विवाद
6. निष्कर्ष (संदर्भ ग्रंथसूची, मुलाखत, अभिमतांवर सदर संशोधनातील प्राप्त तथ्यांचे विश्लेषणात्मक अध्ययन पश्चात प्राप्त निष्कर्षाची मांडणी सदर प्रकरणात करण्यात येईल. प्राप्त निष्कर्ष सकारात्मक किंवा नकारात्मक असू शकतील)

संशोधक विद्यार्थी
गिरीश बाबुराव कुलकर्णी

मार्गदर्शक
डॉ. महादेव गव्हाणे
राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर